Chapter-6

# प्रकरण - 6

## उपसंहार

प्रबंधाचा उपसंहार या प्रकरणात दिलेला आहे. प्रबंधाच्या प्रत्येक प्रकरणांतून प्रस्तुत विषयासाठी आवश्यक ते संदर्भ देत त्याची चर्चा केलेली आहे व त्याविषयी साधक बाधक विचार मांडण्यात आलेले आहेत; त्यानुसार प्रत्येक प्रकरणाचे निष्कर्ष, फलित 'उपसंहार' या प्रकरणांत थोडक्यात दिलेले आहेत. केवळ सुशिक्षितांचीच मिरास बनलेली ग्रंथसंपत्ती सामान्यातल्या सामान्य व साधी अक्षर ओळख झालेल्या स्त्री पुरुषांनाही सुलभ व्हावी ह्याच हेतूने महाराजांनी उत्तम पुस्तकांची देशी भाषांमधून निर्मिती करवून ती 'श्री सयाजी साहित्यमाले'तून प्रसिद्ध करण्यात आली. अशाप्रकारे महाराजांची ग्रंथाविषयक भूमिका एतद्देशीयांना आपले स्वत्त्व राखीत आधुनिकता अंगिकारण्यासाठी अत्यंत महत्त्वाची अशी होती. या सर्व प्रक्रियांचा विचार करीत त्याचे सद्यकाळातील महत्त्व येथे विशद करण्यात आलेले आहे.

श्री सयाजी महाराज यांच्या योजनेनुसार निर्माण झालेल्या ग्रंथांचा अभ्यास करताना पहिल्या प्रकरणात 'गायकवाड घराण्याचा थोडक्यात इतिहास दिला आहे. गायकवाड हे मूळचे कुठले इथपासून श्रीमंत सयाजीराव गायकवाड(तिसरे) (1863-1939) ह्यांच्या दत्तकविधानाची हकीकत देऊन, त्यांना राज्याधिकार प्राप्त झाल्यानंतर त्यांनी ज्या काही सुधारणा आपल्या संस्थानात केल्या त्यांची माहिती या प्रकरणात दिली आहे. महाराजांच्या या कार्याला असलेल्या अनेक बाजू आपल्याला लक्षात घ्यावा लागतात. त्यांना मराठ्यांशी असलेला ऐतिहासिक परंपरेचा दुवा आणि ब्रिटिश वसाहतवादी-साम्राज्यवादी शक्तींशी निभवावयाचे धोरण, यातून वाट काढावयाची होती. तसेच कौटुंबिक पातळीवरील घडामोडीत राखावयाचे सावधपण आणि सामाजिक पातळीवरील वर्णवर्चस्ववादी व्यवस्था व त्यातून साधावयाचे बहुजन निष्ठेचे धोरण, आत्मविकास आणि सामाजिक प्रगती या भूमिकेतील ठेवावयाचा समतोल, आपली पौर्वात्य निष्ठा

व त्यातील मार्गी आणि देशी परंपरा यांची जाणीव आणि पाश्चात्य ज्ञानाचे स्त्रोत रूपातील अवतरण, भूमिनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा आणि विश्व यातील एकरूपतेत पायाभूत असणारी देशीयता या साऱ्यातून त्यांना मार्गक्रमण करावयाचे होते. श्री सयाजी साहित्यमालेतून प्रकाशित झालेल्या पुस्तकांकडे दृष्टिक्षेप केला तरी, युद्ध, राज्यनीति, घटना, शासनपद्धती, समाजातील जातीजमाती, आचारविचार, मुलांचे संगोपन, शिक्षण या जीवनाच्या भौतिकतेचा किती सूक्ष्मपणे त्यात विचार केला आहे हे लक्षात येते, पण त्याचबरोबर या भौतिक विकासात बदलत्या काळाला अनुरूप असा धर्माचा सूक्ष्म, सर्वसमावेश असा विचार होण्याची आवश्यकता त्यातील धर्मविषयक पुस्तकांतून जाणवते. धर्मविषयक पुस्तकातही भारतातील व जगातील धर्माच्या व्यापक आणि सर्वसमावेशतेचा विचार आणि नीतितत्त्वांच्या सूक्ष्म विचारांची, प्रश्नांची जाणीवही प्रकट होते. म्हणजे भौतिकता व धार्मिकता तसेच आध्यात्मिकता यांच्या समतोलाचा विचार त्यातून अभिव्यक्त होतो. श्री सयाजी साहित्यमालेच्या कार्याला असलेल्या अनेकविध कार्याची, घटकांची, परिमाणांची जाणीव होण्यासाठी त्यामागे असणारे ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक पर्यावरण जाणवणे आवश्यक होते. प्रकरण पहिल्याचा विचार करताना हा दृष्टिकोन समोर ठेवला आहे.

महाराजांची कारकीर्द हिंदुस्तानात अपूर्व झाली आहे हे या सदर प्रकरणात लक्षात येते. इतकी दीर्घकालीन असून सुद्धा ती अत्यंत शांततेची, भरभराटीची, प्रगतीची आणि वैभवाची झाली आहे. इ.स. 1881 च्या शेवटी सयाजी महाराजांना राज्याचे अधिकार मिळाले आणि इ.स. 1939 मध्ये ते स्वर्गवासी झाले. या 57 वर्षाच्या राजसत्तेत त्यांना अनेक वेळा इंग्रजी राज्यसत्ता, त्याच्याशी प्रकट करावी लागणारी राजनिष्ठा, आपले न्याय अधिकार, प्रजा कल्याणासाठी करावयाची कार्ये आणि कर्तव्ये या सर्वांतून अत्यंत बिकट परिस्थितीतून काम करावे लागले. महाराजांचे राज्य गुजरातमध्ये आणि तेही विखुरलेले. पालनपूर , द्वारका, बिलीमोरा या त्रिकोणात गायकवाडांचे राज्य होते, तर अहमदाबाद, खेडा, सुरत इ. ठिकाणी ब्रिटिश राज्यांन्तर्गत जिल्हे पसरलेले होते त्यामुळे पोलीस व्यवस्था, जकात, गुन्हेगारी इ. अनेक विषयांच्या संबंधाने दोन्हीमध्ये सतत संघर्ष यायचा. सयाजी महाराज सज्ञान होताच राज्यातील मीठासंबंधी आणि टपाल खात्या संबंधीचे हक्क एकेक करीत इंग्रजांनी गिळंकृत केले होते. हे महाराजांच्या लक्षात आले होते आणि त्यामुळे महाराजांचे मन सदैव सावध असावयाचे. त्यामधून राष्ट्रोद्धार आणि इंग्रजी सत्ता यांच्या

कचाट्यात राहूनही त्यांची कूटनीति ओळखत आपले कार्य सदैव राष्ट्रोद्धाराशी कसे जोडलेले राहील, अशा मार्गाचा त्यांनी अवलंब केला. हिंदुस्तानचे माजी व्हाईसरॉय लॉर्ड वुइल्डिन यांनी 'बडोदे राज्यातील सुवर्णयुग' म्हणून या कारकीर्दीचा उल्लेख केला आहे. वयाचा अवघ्या बाराव्या वर्षी राज्यसूत्रे हाती येण्याचे कल्पनेतही कधी न घडणारे सत्य त्यांच्या बाबतीत घडून आले, व त्यामुळे या कामासाठी ज्याची बिलकुल तयारी नव्हती, अशा पुरुषाने हे श्रेय मिळविले. महाराजांच्या समोर इंग्रजी सुराज्यव्यवस्थेचा जो नमुना त्या काळी होता त्याचे केवळ त्यांनी अनुकरण केले नाहीं, तर त्या राज्यव्यवस्थेतील चांगला भाग घेऊन त्यात आपल्या उच्च कल्पनाशक्तीच्या बळावर अनेक नवीन गोष्टींची भर घातली, आणि त्यामुळेच त्यांच्या राज्यकारभाराला मौलिकता प्राप्त झाली. सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण, न्याय व अंमलबजावणी खात्यांची फारकत. ग्रामसंस्थांचे पुनरूज्जीवन, मोफत वाचनालयांचा प्रसार, सामाजिक सुधारणांचे कायदे, धंदेशिक्षणाची सोय वगैरे अनेक प्रकारची आपल्या राज्यकारभारात जी भर त्यांनी घातली, त्यामुळे कल्पना व व्यवहार, युक्ती आणि प्रयुक्ती अथवा उपपत्ती आणि प्रयोग यांच्या मिलाफाचे दर्शन आपल्याला होते.

प्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणात 'श्री सयाजी साहित्यमाला सुरू करण्यामागचा उद्देश' याची चर्चा केली आहे. सदर ग्रंथमाला 19 व्या शतकात निर्माण झालेली असल्याने ब्रिटिश राजवटीचे एकूणच मराठी संस्कृतीवर घडलेले परिणाम, समाजामध्ये होत असलेले वैचारिक अभिसरण, नव्या जीवनदृष्टीचा भाषा आणि साहित्य यावर होणारा परिणाम यांचा विचार या प्रकरणात केलेला असून त्या संदर्भात बडोदा आणि मराठी साहित्य इ. प्रक्रियांचा वेध धेतला आहे.

त्यातही, महाराजांचे कार्य अधिक वैशिष्टपूर्ण झाले याचे कारण परकीय संस्कृतिचा प्रभाव आणि एतद्देशीय संस्कृतीचे सत्त्व यांच्या संबंधीचा त्यांचा दृष्टिकोन हा अधिक नवा, प्रगतिशील आहे हे त्यांच्या शिक्षणविषयक, साहित्यविषयक, भाषाविषयक, उपक्रमांमधून दिसून येते. या सर्वांची तपशीलवार आणि सूक्ष्मपणे विस्तृत चर्चा सदर प्रकरणात केली आहे.

याच पार्श्वभूमीवर प्रकरण तीन मध्ये 'श्री सयाजी साहित्य मालेतून आजवर (इ.स. 1915-2007) प्रसिद्ध झालेल्या ग्रंथाची सूची दिली आहे. (हिंदी, मराठी, गुजराती) याचे अवलोकन केल्यावर असे

लक्षात येते की, इ.स. 1952 अखेरपर्यंत सदर साहित्यमालेतून जवळजवळ 316 पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. ज्यात मराठी पुस्तकांची संख्या जवळजवळ 80 इतकी आहे. सदर प्रबंधात केवळ मराठी पुस्तकांपुरताच विचार केलेला आहे. इ.स. 1952 पर्यंत सदर ग्रंथमालेतून मराठी पुस्तके प्रसिद्ध होत होती. त्यानंतर मराठीतील ग्रंथनिर्मिती बहुतांशी थांबली. या सर्व सूचीच्या अखेरीस अभ्यासिकेने त्यासंबंधीची आपली निरीक्षणे नोंदवली आहेत. स्वत:ची भाषा म्हणजे मातृभाषा, आपल्या प्रजेची भाषा आणि ज्या विशाल राष्ट्राचे आपण घटक आहोत त्या हिंदी राष्ट्राची भाषा यांना सारख्याच आत्मीयतेने न्याय देत, या सर्वच लोकभाषा या ज्ञानभाषा पातळीवर आणण्याची प्रेरणा यामधून दिसते.

प्रकरण चौथ्यामध्ये 'श्री सयाजी साहित्यमालेतील ग्रंथाचे वर्गीकरण' केलेले आहे. बडोदे राज्याच्या साहित्य प्रवृत्तिच्या इतिहासात सदरहू ग्रंथमालेचे तिसरे स्थान आहे. ही साहित्यमाला जेव्हापासून सुरू झाली तेव्हापासूनच या ग्रंथांचे 1. इतिहास, 2. शिक्षण, 3. चरित्र, 4. विज्ञान, 5. वार्ता, 6. धर्म, 7. प्रकीर्ण असे वर्ग करून त्यांना 'गुच्छ' असे नाव देण्यात आले होते त्यानुसार सदर ग्रंथमालेचा अभ्यास करताना ग्रंथाचे त्या त्या गुच्छा प्रमाणे वर्गीकरण करण्यात आले आहे. व वर्गीकरणानुसार ग्रंथाचा अभ्यास करण्यात आला आहे. ह्या ग्रंथमालेतील पुस्तकांकडे दृष्टिक्षेप टाकल्यास असे आढळून येते की, केवळ भाषांतरित ग्रंथच निर्माण होत होते असे नाही तर स्वतंत्र ग्रंथ निर्माण करण्याचीही सोय मालेत केली होती.त्यानुसार अनेक भाषांतरित आणि स्वतंत्र असे ग्रंथ निर्माण झाले आहेत. अनेक नामवंत लेखकांनी सदरहू मालेत लेखन कार्य केले आहे. रा. ब. गो. स. सरदेसाई, वि. स. वाकसकर, दा. ना. आपटे, य. रा. दाते, चिं. वि. जोशी, ग. र. दंडवते, वि. पां. दांडेकर, न. चि. केळकर इ. अनेक तज्ज्ञ व नामवंत लेखक आहेत.

अनेक लेखकांना या मालेचा मोठा आश्रय होता, व त्यामधून वैचारिक वाङ्मय निर्माण झाले आहे. बहुजन समाजाला ज्ञान देणे, देशी भाषा ही ज्ञानभाषा बनविणे, समाजात नवी वैज्ञानिक दृष्टी निर्माण करणे, परंपरेतील सत्त्वाचे रक्षण करणे, समाजमानसावर मूल्यसंस्कार करणे आणि एकंदरच समाजाचा वैचारिक स्तर वर्धित करणे, हा अतिशय पायाचा असा विचार ह्या मालेच्या निर्मितीमागे होता. श्री महाराज साहेबांनी आपल्या कारकीर्दीत ज्ञानप्रसारार्थ जे अविरत श्रम केले त्यांची साक्ष सदरहू ग्रंथमालेच्या रूपाने दिसून येते. या सर्वांच्या विचार तपशीलवार पणाने या प्रकरणात केलेला आहे.

प्रकरण पांचमध्ये 'दृष्टिकोण आणि फलित' यांचा विचार केला आहे. सयाजी महाराजांच्या शिक्षणविषयक, साहित्यविषयक, भाषाविषयक, संस्कृतीविषयक आणि समाजविषयक दृष्टिकोनाची चर्चा प्रकरण दोन मध्ये केलेली होती. त्यानुसार निर्माण झालेल्या या ग्रंथाच्या निर्मितीची आणि त्यांच्या यशापयशाची चर्चा प्रस्तुत प्रकरणात केलेली आहे. श्री सयाजी साहित्यमालेतील ग्रंथांची उपयुक्तता, त्यातील दृष्टिकोन, देशीभाषा सक्षमीकरणाचे आयोजन, बहुजनसमाज व शिक्षण, साहित्यविषयक नवे विचार अशा अनेक पैलूंचा विचार करताना श्री सयाजी साहित्यमालेच्या निर्मितीमागे असलेले सयाजी महाराजांचे विचार व कृती यातील अन्वय दर्शविण्यासाठी आवश्यक तेथे हुजूर हुकूम दिलेले आहेत. तसे ते प्रबंधातही इतरत्र सुद्धा दिलेले आहेतच व त्यायोगे विचार, आचार, कृती यातील अन्वय दाखविता येतो. शासकाने मांडलेले विचार व कृती, त्याचे अंमलीकरण यामध्ये एतद्देशीय शासनाने फरक निर्माण होतो, ही बाब येथे महत्त्वपूर्ण ठरते. श्री सयाजी साहित्य मालेतील ग्रंथांचा विचार करताना या भोवती असलेले राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक वातावरणाचे संदर्भ पाहता धागेदोरे जोडून घेत त्याचा विचार केलेला आहे. त्यामुळे श्री सयाजी साहित्य मालेचा विचार एकेकटा व सुटा करण्यापेक्षा तो ऐतिहासिक दृष्ट्या अनेक घटकांच्या परिप्रेक्ष्यात करणे अधिक संयुक्तिक ठरते. या किंवा या सारख्या अनेक ग्रंथांच्या निर्मितीयोजना, त्यामधील मराठी, गुजराती, हिंदी भाषाविषयक धोरण हे स्वपरिसर व मातृभाषा, प्रदेशभाषा आणि राष्ट्रभाषा यात परकीय प्रभावातील नवनवे ज्ञान रुजवत बदलत्या काळपरिस्थितीत आपली देशीमुळे अधिक मजबूत पक्की व समर्थ करीत खोलवर नेऊ पाहणारी, स्थलकाल सापेक्ष, संस्कृतिसापेक्ष आधुनिकीकरणाची प्रक्रिया आहे व ती प्रक्रिया आपल्याला येथे पाहता येते. त्यातील मराठी, गुजराती, हिंदी भाषाविषयक धोरण व त्यातून निर्माण होऊ पाहणारे देशीभाषा उत्थानाचे कार्य हे एक प्रकारे सांस्कृतिक पातळीवरील राजकीय व्यूहाचे विधान आहे असे आपल्याला म्हणता येते. या सर्वांचा विचार प्रकरण पाचमध्ये केलेला आहे.

देशीवादाचा विचार हा मराठी व इंग्रजीत भालचंद्र नेमाडे, गणेश देवी, चंद्रशेखर जहागीरदार, रवींद्र किंबहुने, मकरंद परांजपे, हरिश्चंद्र थोरात, अशोक बाबर यासारख्या समकालीनांनी विवरण व विशलेषण, चिकित्सा पातळीवर केलेला आहे. देशीवादी विचाराची ही परंपरा आपल्याला भूतकाळात मागे जात बुद्ध,

फुले, बसवेश्वर, राजारामशास्त्री भागवत यांच्या पर्यंत नेता येते कारण "संस्कृती ही कृत्रिम उष्णतागृह नसून एक भूमिनिष्ठ प्रक्रिया आहे, साहित्य हे सैद्धांतिक प्रणाली नसून जिवंत व्यवहार आहे, हे तत्त्व मानले पाहिजे." (नेमाडे, टीका स्वयंवर पृ.188) यामुळे देशीवादी विचारांच्या या दुव्यात सयाजी साहित्यमालेच्या कार्यानुसार सयाजी महाराजांचे विचार ही एक बीजरूप कडी आहे या तऱ्हेचे फलित या प्रकरणातून दाखविण्यात आले आहे.